## वृध्द महिलेच्या गळयातील सोनसाखळी जबरदस्तीने हिसकावणारा आरोपी २४ तासाचे आत गजाआड

## गुन्हेशाखा, युनिट-३ ची कारवाई.

पुणे शहरा मध्ये होणा-या सोनसाखळी चोरीच्या घटनांना प्रतिबंध करुन सोनसाखळी चोरीचे गुन्हे उघडकीस आणने बाबत मा. पोलीस आयुक्त, रश्मी शुक्ला मॅडम, मा. पोलीस सह आयुक्त श्री. रविंद्र कदम सो. यांचे मार्गदर्शना खाली आणि गुन्हे शाखेचे श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, श्री. पंकज डहाणे सो, पोलीस उप-आयुक्त, श्री. समीर शेख सो, सहाय्यक पोलीस आयुक्त-१. यांचे सुचना नुसार गुन्हे शाखा, युनिट ३, चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिनकर मोहिते, यांचे दिमतीत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

दिनांक १२/०७/२०१८ रोजी फिर्यादी अरुणा उदय वागळे वय ७० वर्षे रा. रास्तापेठ, पुणे या सकाळी ६/३० वाजता बॅनर्जी चौकातून पुढे चालत असताना स्टेट बॅक ऑफ इंडियाचे समोर, अंदाजे ६/४५ वाजता एका अनोळखी इसमाने त्यांचे गळयातील सोन्याची चैन जबरीने हिसकामारुन चोरुन नेली. त्या नुसार बंडगार्डन पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १८१/२०१८ भा. द. वि. क. ३९२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेचे वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शना नुसार सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, युनिट ३, यांना करणे बाबत सुचना देण्यात आल्या.

फिर्यादी यांचे कडे गुन्हयाच्या घटने बाबत सखोल विचारपुस करुन गुन्हयातील आरोपीने घातलेले कपडे आणि आरोपीचा बांधा या वरुन घटनास्थळाचे आसपासचे परिसरातील सी. सी. टी. व्ही. फुटेजची तांत्रिक विश्लेशन केले असता त्या भागातून एक इसम संशयीत रित्या सार्वजनिक रस्त्यावरुन पळत असल्याचे गुन्हे शाखा युनिट ३, चे पोलीस नाईक ८३६ अतुल साठे यांनी निष्पन्न केले. तसेच पो हवा ९८७ स्वामी, पो ना ८३६ साठे, पो ना ६४९१ सुजित पवार यांनी त्यांचे गोपनिय बातमीदार तसेच स्थानिक नागरीक यांचे कडे मिळालेल्या सी सी टी व्ही फुटेजच्या अनुषंगाने सखोल विचारपूस करुन आरोपीचे ठावठिकाणा बाबत प्राथमीक माहिती प्राप्त केली. पो ना ८३६ अतुल साठे यांना गोपनिय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, वरिल गुन्हयातील आरोपी हा चोरलेली सोनसाखळी विकण्या करीता कॅफे ग्रॅड हॉटेल, पुणे स्टेशन या ठिकाणी येणार आहे. त्यानुसार गुन्हे शाखा, युनिट ३, चे अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा रचून संशयीत इसमास शिताफिने ताब्यात घेऊन सखोल तपास केला असता. आरोपी नामे अमोन ऊर्फ सनी सॅमसंग कोल्हापुरे वय ३२ वर्षे रा. ३९४ न्यू मंगळवार पेठ, परुळेकर वाडा, नरपतगीरी चौक पुणे याने बंडगार्डन पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १८१/२०१८ भा.द.वि.क ३९२ हा गुंन्हा केल्याची कबुली दिली. गुन्हयात चोरीस गेलेली ४५,०००/- रुपयाचे सोन्याच्या चैन चे दोन तुकडे आरोपी कडून हस्तगत करण्यात आलेले आहेत.

वरील कामगिरी गुन्हे शाखेचे श्री. प्रदीप देशपांडे सो, अपर पोलीस आयुक्त, श्री. पंकज डहाणे सो, पोलीस उप-आयुक्त, श्री. समीर शेख सो, सहाय्यक पोलीस आयुक्त - १ यांचे मार्गदर्शना खाली युनिट ३ गुन्हे शाखा चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनकर नामदेव मोहिते, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप नारायण देशमाने, पोलीस कर्मचारी अतुल साठे, शिवानंद स्वामी, सुजित पवार, संदीप राठोड, अनिल घाडगे, रोहीदास लवांडे, महेंद्र पवार, गजानन गानबोटे, संदीप तळेकर, कल्पेश बनसोडे, यांनी केली आहे.